॥ श्री सोमेश्वर महालक्ष्मी प्रसन्न ॥

# सिंहगडाचा पोवाडा

## ( तानाजीचा पराक्रम )



卐

-कवि-

कै. शाहीर सदाशिव लक्ष्मण ठोसर

卐

मूल्य ५० पैसे

## अर्पणपत्रिका

'आधी लगिन कोंडाण्याचे मग लगिन रायबाचे'
ही तानाजीची वृत्ति जोपासणाऱ्या
देशभक्तांच्या चरणी, 'नानिवडेकर
शाहिरी संगम'चे हे दुसरे
प्रकाशन पुष्प सादर समर्पण

कै. शाहीर ठोसरकृत

# सिंहगडाचा पोवाडा

(नरवीर तानाजीचा पराक्रम)



## चौक १ ला

(चाल: मिळवणी)

गातो आता सिंहगडाचा पोवाडा । उदयभानु बडा ।
बाटगा नोडा । ठेचला ऐका नवलाई ।।
स्थापिली हिंदुपातशाही । धन्य मातोश्री जिजाबाई ।। ध्रु. ।।

जगामध्ये कितीक झाल्या माता । होतील आहेत आता ।
त्यात श्रेष्ठता । पावली एक जिजाबाई ।।
एकटया शिवरायाची नाही । हिंदु धर्माची झाली आई ।।
दिल्लीपती आला जोरावर । झाला शिरजोर ।
घेऊन तलवार । उठला हिंदु धर्मावरती ।।
बाटविले कैक नाही गणती । नाव ऐकता हिंदु पळती ।।
जिकडे तिकडे उडाला हाहा:कार । रजपुत भिऊन सारं ।
मराठेही वीर । मिळाले थोडे बादशहाप्रती ।।
बाकी आपसात चुरस करती । स्थापण्या राज्य कठीण किती ।

(चाल)–ती वेळ आणीबाणीची । हिंदूंच्या मर्दुमकीची ।।
पुत्रांच्या मातृभक्तीची । मातांच्या मातृत्वाची ।।
मारण्याची किंवा मरण्याची । कर्त्यांच्या कर्तृत्वाची ।।
त्या जिजाबाई माउलीनं केला सुविचार सोडलं विजापूर ।।
स्वातंत्र्यांकुर म्हणी इथं नाही फोफावणार ।।
घेऊन गेली पुण्याला संगं बाल शिववीर ।।
शिक्षण दिलं धर्माचं राजकारणाच केला हुशशार ।।
सोळाव्या वर्षी सुरवात गनिमी लढणार ।।
किती किल्ले बळकाविले नाही कुठे हार ।।
(चाल मिळवणी)–संगे रणधीर वीर तानाजी ।
फासलकर बाजी ।
कंक येसाजी । जिवाचे कलिजे भाई भाई ।।
मानिती जिजाईस आई । धन्य मातोश्री जिजाबाई ।।

## चौक २ रा

(मिळवणी)

आला चालून सिद्दी जोहार । मोठा सरदार ।
बढाईखोर । विडा उचलून पाच पानी ।।
बोले हम बडा खानदानी । पिला दूं मराठेकु पानी ।।
मराठ्यांशी पडली त्याची गाठ । लढती अफाट ।
दाविती न पाठ । स्वाराला स्वार जाऊन भिडती ।।
मराठे वीर अचुक लढती । उपजली सिद्दीमनी भीती ।।
बोल बोलता जिरली घमेंडी । पळता भुई थोडी ।
बचावुनी दाढी । सिद्दी जोहार पळत सुटला ।।
बोले ये सैतान है अल्ला । तोबा तोबा अल्ला भिसमिल्ला ।।
(चाल)–दुसरा बडा भाई शाहिस्तेखान । पळवीला बोटे छाटून ।।

दगाबाज तो अफझलखान । मारीला वाघनखानं ॥
एक एकटे हरविले तीन । बादशहा झाला बेभान ॥
(चाल)–मग मोअज्जिम जयसिंग दोघे वीर धाडले ॥
मोठे सैन्य तोफखाना संगे घोडे दौडले ॥
मजल दर मजल करित सारे दक्षिणेत पातले ॥
दर्यावानी तुफान सेना बघुन मराठे हादरले ॥
दोन हल्ले मराठ्यांनी शिताफीने चढविले ॥
परि पुढं टिकाव अवघड शिवबा उमजले ॥
(मिळवणी)–बलाबल जाणून टाकितो डाव । आमचा
शिवराव ।
किल्ले म्हणी घ्यावं । आमच्यापासून परत काही ॥
मुलगा त्यो कोणाचा हाई । त्याची मातोश्री जिजाबाई ॥

## चौक ३ रा

(शिवाजीने वेळ प्रसंग ओळखून मोगलांशी तह केला व २६ किल्ल्यांपैकी १८ किल्ले मोगलांना दिले. त्यात कोंडाणाही दिला.)

(चाल)–मोअज्जिम जयसिंगाला । आनंद लई झाला ।
दोन बोटं उरला स्वर्ग । त्याला चढली विजयधुंदी ॥
मराठेशाहीची नाकेबंदी । कोंडाणा घेऊन केला संधी ॥
आपल्या सैन्याचा तळ हालविला । खंद्या वीराला ।
उदयभानूला । कोंडाण्यावर नेमून परत फिरले ॥
ताब्यात त्याच्या दिले सारे किल्ले । म्हणती काय मराठे
आता मेले ॥
नाकेबंदीचा किल्ला गेला । कोंडाणा आपुला ।
जीव हळहळला । शिवबा मनी चिंतातुर झाले ॥

मराठे वीर सारे जमले । बारांनी बारा बेत केले ॥
(चाल)–गडामधी गड गेला कोंडाणा । मराठेशाहीची
होईल दैना ॥
रात्रंदिन झोप नाही कोणा । लागली हुरहुर सर्वांना ॥
काही केल्या बेत जमेना । उपाय सुचविती नाना ॥
(चाल)–चलबिचल अशी ही पाहून जिजाबाई बोले ॥
मुर्दाड भार भूमिला कशाला रे जगले ।
स्वातंत्र्य पारखे जिवंत असुनी मेले ॥
शिवराय डिवचता सिंह जसे खडबडले ॥
पाहूनि सोन्याची संधी ही माता काय बोले ॥
भवानीनं रात्री मला स्वप्नामधि सांगितले ॥
(चाल)–सकाळच्या रामप्रहराला । तुझ्या नजरेला ।
पडेल जो किल्ला । सोडवा जीव त्याचे पायी ॥
कोंडाणा आज पाहिला म्हणी आई । धन्य मातोश्री
जिजाबाई ॥

## चौक ४ था

### (मिळवणी)

शिवराय राजकारणी । माता त्याहुनी ।
समशेर भवानी । दावुनी पाया पडुनि आईला म्हणती ।
हरवील हिला अशी कुणाची छाती ।
माता काय बोलं ऐका पुढती ॥
दावता कमरेच्या नुसत्या तलवारी । ऐट वरिवरी ।
विराटाच्या घरी । मुलगा (उत्तर) काय थोडकं रे
बडबडला ? ॥
अखेर काय त्यानं दिवा लावला । सांग का रे कोंडाणा
घालविला ॥

वेद उपनिषद सार सांगुनी । कृष्ण देवांनी ।
अर्जुना रणी । लढविलं सांग कशासाठी ॥
फुकट जन्मलास माझ्या पोटी । हिऱ्याच्या खाणीत गारगोटी ॥
**(चाल)**–एकीकडं आईच्या इच्छेची आड । विहीर बघा लढाईची दुसरीकडं ॥
शिवबा राजाला पडलं मोठं कोडं । दोन्ही बाजू आहेत कशा बीनतोड ॥
अखेर दिलं वचन आईला लै गोड । शत्रूचा पुरा करतो बीमोड ॥
**(चाल)**–ऐकुन आनंदाश्रू आईच्या नयनी बघा थबथबले ।
फिरविताच पाठीवर हात शिवबा गहिवरले ।
इतक्यात रायाच्या लग्नाला बोलवाया आले ।
शेलार मामा तान्हाजी दोघे भेटले ।
आम्ही चाललो आमच्या लग्नाला शिवबा त्यांना बोले ।
वरघोडा निघायचा आज कोंडाण्यावर बोहले ।
**(मिळवणी)**–ऐकता शब्द हे कानी । शेलार मामांनी ।
स्वार सांडणी । धाडीला लगीन थांबवाई ।
धन्य त्या मर्दांची आई । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक ५ वा

**(मिळवणी)**

तिकडं बघा तान्हाजीच्या गावाला । (उमराठे गावाला) ।
सोयरा जो आला । त्याचे दिमतीला ।
कामकरी हेटकरी लई । माहीतगार आणखी मराठे भाई ।
देऊन सोयऱ्यांच्या केल्या सोई ।

दोन्ही बाजूंच्या मांडवाचा थाट । सहस्र साठ ।
दिव्याचा लखलखाट । पाहुनी डोळे दिपून जाती ।
सूर्य काय आलाय पृथ्वीवरती । पाहण्या मराठेशाहीची धर्ती ।
पाहावया रायाचा मुखचंद्र । लाळ घोटी इंद्र ।
सूर्य आणि चंद्र । शाहीर म्हणे इथं झाली यूती ।
होताच जनसागराला भरती । नवल नाही निसर्गाची रीती ।
**(चाल)**–इतक्यामधी आला स्वार सांडणी । लखोटा वाचला रायांनी ।
लगीन थांबवा याच क्षणी । लढाईला निघावं सर्वांनी ।
**(चाल)**–रुकार पहिला दिला वरुमाईंनी ।
हुकूम सर्वांला सोडला रायांनी सूर्यरायांनी ।
राजा बघा बोले तसे दळ हाले बोलता क्षणी ।
आपापले सैन्य घेऊनी निघाले देशमुख वतनी ।
पुढे चालले पहिले मानकरी हत्तीवर दोनी ।
मोहिते चव्हाण महाडीक जाधव थाटांनी ।
**(मिळवणी)**–इकडे तान्हाजी म्हणे शिवराया ।
गड जिंकाया ।
सांडीन मी काया । रायाला समजा माझ्या ठायी ।
गहिवरून आशीर्वाद देई । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक ६ वा

(तानाजीराव म्हणतात, 'शिवबा राजे, न्हाऊ द्या माझ्या पोराचं लगीन ! आधी लगीन कोंडाण्याचं आणि मग माझ्या रायबाचं !' तानाजीच्या तोंडचे हे शब्द ऐकून जिजाईचं हृदय भरून आलं.)

**(मिळवणी)**–तोंडावाटे शब्द उमटेना । स्तब्धता मना ।
मनीच्या खुणा । मनाला कळल्या एकमेका ।

जिव्हाळ्याचा शेवट असाच मुका । मुक्यानं चालतो पुढं ऐका ।
पंचारती घेऊनी आई । आली लवलाही ।
कमती तिथं कायी । टिळक लावी ठळक कुंकुमाचा ।
पाठीराखा म्हणी तू आर्यभूचा । महाराष्ट्राच्या सौभाग्याचा ।
ओवाळणी देई मज तान्हा । गड कोंडाणा ।
मनची कामना । पुरविता वीर नाही दूजा ।
तुझ्याविण कोण करील काजा । आला संदेश निघाल्या फौजा ।
**(चाल)**—आता तान्हाजी ठेवितो डोई । जिजाबाई मातेच्या पायी ।
कडकडुनि भेट मग घेई । शिवबाची तान्हा लवलाही ।
शाहीर अशा या समयी । शिव जीव ऐक्यता पाही ।
(चाल)—तो सुभेदार तान्हाजी तडक निघाला ।
शेलार मामा म्हातारा त्याचे मागे गेला ।
निघताच जिजा माऊली वदे तान्हाजीला ।
बघ वळून मागं डोळे भरून पाहु दे तुला ।
तान्हाजीनं मागं बघताच प्रकार काय झाला ।
स्तब्धता चराचराला कंठ दाटला ।
**(मिळवणी)**—सारे पशू पक्षी आणि वृक्ष । तान्हाजीकडं लक्ष ।
सूर्यही साक्ष । थांबला वायू झुळूक नाही ॥
आईची स्थिती सांगु काई । धन्य मातोश्री जिजाबाई ॥

## चौक ७ वा

**(मिळवणी)**

सिंहगडच्या पायथ्यापाशी । थोडया लोकानिशी ।
गेला त्याच दिशी । मराठा खरा समर गाजी ॥

गडाचा भेद काढू म्हणे आजी । युक्ति सांगता मामा राजी ।।
नाईक चौक्यांचा रायाजी कोळी । वळवू याच वेळी ।
होऊन गोंधळी । नाद त्याला भारी पोवाड्यांचा ।
त्याला ऐकवू दोष त्याचा । टाकू डाव राजकारणाचा ।
तान्हाजीनं घेतलं तुणतुणं । शेलार मामानं ।
मोठ्या ऐटीनं । मारिली थाप डफावरती ।
ऐकता सारे लोक जमती । शाहीर कोण आलाय पाहूया म्हणती ।

**(चाल)**–आला नाईक रायाजी कोळी । चौकीवर जमली
सारी मंडळी ।
लवुन मुजरा करी आमुचा गोंधळी । मुजऱ्याला खूष सारी मंडळी ।

**(चाल)**–त्यो मामा म्हातारा थाप डफावर मारी ।
गोंधळी म्हणे सर्वांना ऐका कारभारी ।
हवालदार म्हणता जसा खूप शिपाई भारी ।
तशी खूष मंडळी सारी म्हणता कारभारी ।
जरी सिंह विसरला स्वतः जात लढणारी
त्याचं त्याला देईल पटवून ऐना शाहीरी ।

**(मिळवणी)**–(मामा) गोंधळी म्हणे ऐका एक घडी ।
करील मजा थोडी ।
आमचा हा गडी । नात्यानं भाचा माझा हाई ।
ऐका आता गोंधळ म्होरं गाई । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक ८ वा

**(गोंधळ)**

उदे ग अंबाबाई उदे ।। उदे ग अंबाबाई उदे ।
कोल्हापुरच्या अंबाबाई गोंधळा यावं ।

तुळजापुरच्या भवानी गोंधळा यावं ।
राजगडच्या जगदंबे गोंधळा यावं ।
प्रतापगडच्या भवानी गोंधळा यावं ।
शिवनेरीच्या शिवाई गोंधळा यावं ।
जेजुरीच्या खंडोबा गोंधळा यावं ।
पंढरीच्या विठोबा गोंधळा यावं ।
औंधाच्या यमाई गोंधळा यावं ।
गाणगापूरच्या दत्तात्रेया गोंधळा यावं ।
बार्शीच्या भगवंता गोंधळा यावं ।
वाडीच्या नरसोबा गोंधळा यावं ।
उदे ग अंबे उदे उदे उदे ।

**(मिळवणी)**–गोंधळी नमी जगदंबेला । मूळ मायेला ।
जगन्मातेला । ऐका आईचं सुयश गाई ।
रणांगणी वीरां यशदायी । युद्ध हा तिचा खेळ पाही ।
येऊ देऊ नका मनामधी शंका । सुयश मिळे एका ।
दुजा तो फुका । रणी लढताना मरून जाई ।
जिंकिता एक भोगी मही । दुजा धारातीर्थी मुक्त होई ।
सारखेच सुयश देई दोघाला । एकमेकाला ।
नाव ठेवायाला । तीळभर जागा ठेवीत नाही ।
म्हणून जो तिचा भक्त होई । मारतो वा मरतो त्याच ठायी ।

**(चाल)**–न्याय हा लागू स्वातंत्र्याला । धर्मवीर आणि राष्ट्रवीराला ।
गुलाम जरी शूर वीर निपजला । मारता मरता लाभ नाही त्याला ।
मारतां, महीभोग दुसऱ्याला । मरतां बघा जातो रौरवाला ।

**(चाल)**–परतंत्र इहपर सौख्य नाही गुलामाला ।
मनाला पटुन रायाजी कोळी गोरामोरा झाला ।
या गुलामीचा नायनाट कराया अवतरला ।
म्हणती कैलास सोडूनी सांभ शिवाजी झाला ।
गोंधळी म्हणे आम्ही हिंडतो चारी मुलखाला ।
आसेतु हिमाचल असा वीर नाही पाहिला ।
**(मिळवणी)**–ऐकता शत्रुची स्तुती । रागाला येती ।
मंडळी किती । मुख्य रायाजी बोलत नाही ।
मनाची साक्ष जनाला काई । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक ९ वा

**(मिळवणी)**

रायाजी कोळी म्हणे गोंधळघाला । अधीर बहु झाला ।
जीव आपुला । शिवाजीच्या दर्शनाचे साठी ।
आजवर पडली होती तुटी । जिवाला जशि अविद्या गुरफाटी ।
गोंधळी म्हणे राया कोळघाला । वेळ काय त्याला ।
सिंह पाहायाला । सापडे पारधीच्या पाठी ।
वनच्या राजाच्या वनात गाठी । पडायच्या नाहीत गावात भेटी ।
रायाजी कोळी म्हणे निक्क्याचा पण । (कमलदेवीच्या निक्क्याचा पण) बळजबरीनं ।
ठरलाय आज म्हणून । गडावर पहारे झिंगताती ।
(रजपूत आणि पठाण दोन्ही जाती)
कुसुंबा पिऊन तर्र हायती । चौक्या साऱ्या आमुच्याच हाती ।
**(चाल)**–वेळ ही पारधीची असली । कळवील कोण या काळी शिववा सिंहाला ।

अजुनिया भ्रष्ट नाही केली । मध्यरातची वेळ नक्की ठरली
कळव तू त्याला ।
द्रौपदी जशी सोडविलीं । शिववानं व्हावं वनमाली याच
वेळेला ।
**(चाल)**–मदत सारी करू मनोभावानं शपथ वाहातो ।
या मावळत्या सूर्याची साक्ष आम्ही ठेवितो ।
लगेच गोंधळी वेश टाकूनी तान्हा गर्जतो ।
नरडीचा घोट म्हणी उदयभान्याच्या घेतो ।
देवाची करणी, नारळात पाणी, पाहून कोळी नमितो ।
तान्हाजी गळ्यातील कंठा कोळ्याला देतो ।
**(मिळवणी)**–भेद किल्ल्याचा मिळविला सारा ।
देऊन ईशारा ।
तान्हा माघारा । परतला मामा संग ह्याई ।
आजच्या तरुणात जोम नाही । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक १० वा

(मिळवणी)

मामा काय बोले आपुल्या भाच्याला । अपशकुन झाला ।
पहिल्या फितुरीला । मावळत्या रविची शपथ वाही ।
चर्र झालं मन त्याच ठायी । लेका (तान्ह्या) धडगत दिसत
नाही।
चैन खाली पडणार नाही पायथ्याला । तुला सोडून मला ।
आता एकल्याला । होणार कधी चुकत नाही ।
म्हणून तुझ्यासंग येणार मीही । नाही हो म्हणू नको काही।

ऐकून तान्हाजीला आनंद लै झाला । म्हणी जाऊ चला ।
पश्चिम बाजूला । गडावर तिकडं पहारा नाही ।
उंच कडा खोल दरी हाई । सुयश आपणाला त्याच ठायी
(चान)–रात्र अंधारी भयाण भारी । तीही ना किर्र शब्द करी ।
आणखी किती सांगू खोल दरी । पोचेना रविकर तेथवरी ।
अशा त्या ठायी गेली स्वारी । निवडक मावळे बरोबरी ।
(चाल)–टेहेळकरी तुम्ही सांगा सूर्याजीला गेलो आम्ही पुढती ।
आतुन उघडतो कल्याण दरवाजा घुसा मग वरती ।
मोहिते चव्हाण महाडीक आपले सेनापती ।
यांच्यासह तुम्ही सावध रहावं कल्याण दारावरती ।
आता शेंदूर थापून मस्तकी घोरपड पुजिती ।
चढायासाठी कठीण तो कडा नाव यशवंती ।
(मिळवणी)–बांधुनी दोरखंड तिच्या कमरेला ।
तान्हाजीनं तिला ।
प्रणिपात केला । वेळ आता लावू नको ग बाई ।
चढ यशवंती सुयशदायी । धन्य मातोश्री जिजाबाई ।।

## चौक ११ वा

(मिळवणी)

यशवंती सरसर चढली । अर्ध्यावर गेली ।
भविष्य समजली । परतली खालतं येण्यासाठी ।
मामाच्या धस्स झालं पोटी । रक्षिता म्हणे जगजेठी ।
मामा काय बोलला यशवंतीला । झालं काय तुला ।

आजच्या येळला । मागं अशी कधी फिरलीस नाही ।
यशा अपयशाची पर्वा नाही । वीराची वीर भावना ही ।
बऱ्या बोलानं वर तू ग जाई । नाही तर पायी ।
ठेविन तुझी डोई । मागं म्होरं आता पाहणार नाही ।
गेली वर तिचा पाड काई । विचारी रडत धायी धायी ।
(चाल)–भारती त्यावेळी अशी ही मुकी । जनावरे पाळीत होती नेकी ।
चराचरी राष्ट्र कार्यी एकी । तत्त्वज्ञान पटलं होतं लोकी ।
देह जरी पडला मृत्युमुखी । आत्मा अविनाशी राहतो बाकी ।
खरोखर दादा । दादारंऽजी रं जी ।
(चाल)–जाणून तो सुभेदार तान्हाजी पहिला वर चढला ।
शेलार मामा म्हातारा त्याच्या मागं गेला ।
एका मागून एक असा दोनशे वीर वर चढला ।
पोचले कड्याच्या वरतं वेळ नाही त्याला ।
अर्धे तुम्ही उघडा छापा घालूनी कल्याण दरवाजाला ।
तोवर आम्ही हिकडं सोडवितो कमलदेवीला ।
(मिळवणी)–सारे गाफील रजपूत पठाण । अर्धे अधिक जाण ।
टाकले छाटून । बधा बोल बोलता वेळ नाही ।
रणी जगदंबा सहाय्य होई । धन्य मातोश्री जिजाबाई ।।

## चौक १२ वा
**(मिळवणी)**

हलकल्लोळ एकचि झाला । कोठून कसा आला ।
कुणाचा घाला । सपन की खरे कळत नाही ।

सैरावैरा पळती दिशा दाही । भांबावले हत्यार गावत नाही ।
थोडया वेळामधी सावध झाले । लगेच उलटले ।
सरसावून भाले । घे घे हाणमार करती ।
परस्पर दातओठ खाती । मारू वा मरू तुटून पडती ।
वार्ता ही ऐकता क्षणी । जसा जाळीतुनी ।
निघे चवताळुनी । वाघ तसा भानू बाहेर पडला ।
घेऊन तलवार ढाल आला । तोच तान्हाजी येऊन भिडला ।
(चाल)–नजरेला नजर दोघांची भिडली । वीरांची वीराला
खूण पटली ।
नंग्या तलवारी चमक झडली । काळोखात आकाशी जशी
बिजली ।
आता तोडीला तोड सुरू झाली । दोघांनी शर्थ बहु केली ।
(चाल)–बारा रेड्यांची शक्ती एकट्या उदयभानूला ।
तान्हाजी काही कमी नव्हता ऐका भाग पुढला ।
दहा हजार जोर बैठका काढी येळेला ।
त्याला पाच पाचुंदे रोट लागत न्याहारीला ।
द्वापारी भीम-जरासंध जसा लढविला ।
भगवान पाठीराखा तसा मामा बाजूला ।
(मिळवणी)–डावासी डाव टाकती । सांगू तरी किती ।
खुंटली मती । कवीला पुढं स्फूर्ति देई ।
अहा तूं धन्य माझे आई । धन्य मातोश्री जिजाबाई ॥

## चौक १३ वा

(मिळवणी)

वरती तान्हाजीच्या तमंचा वाराला । कंबर त्यानं केला ।
बहिरा उलट दिला । भानूच्या शिरवारानं ढाल फुटली ।

(तान्हाजीच्या हातची ढाल फुटली ।)
गुंडाळून शेला ढाल केली । धन्य त्याची माय त्याला व्याली
एकमेकांना वार लागती । सांगू तरी किती ।
तेल तोवर ज्योती । रक्तानं न्हाले वीर दोन्ही ।
लाली त्याची चढली आकाशी पाही । तान्हा मावळला उगीच नाही ।
**(चाल)**–भानूही थकला त्राण नाही । माराया परी लाथ धाव घेई ।
म्हातारा मामा आडवा होई । कमरेचा वार चुकवी पाही ।
केला चवताळुन वार जनोई । भानूला उभा चिरला वेळ नाही ॥
हो खरोखर दादा । दादा रं ऽ जी रं दाजी रं जी ।
**(चाल)**–पडताच तान्हाजी जोर शत्रूनं केला ।
जरी मर्द मावळे परी धीर त्यांचा खचला ।
आवरून शोक मामानं चंग बांधीला ।
लाजले तरुण वीरश्री चढली सर्वांला ।
इतक्यात कल्याण दरवाजानं सूर्याजी आला ।
शाबास लढून शर्थीनं किल्ला सर केला ।
**(मिळवणी)**–ओवाळावे दिवे जिवाचे लक्ष कोडी । त्यांच्यावरून कुडी ।
कुरवंडुनि सांडी । शाहिर म्हणे जिवाची दूर बलाई ।
नावासाठी यात काय नाही । धन्य मातोश्री जिजाबाई ।

## चौक १४ वा

**(मिळवणी)**

किल्ला जिंकिला बातमी ही खास । कळाया शिवबास ।

आग गंजीस । लावली ज्वाळा गगनभेदी ।
मामा सूर्याजीला न्हवती शुद्धी । हरपलं भान आणि बुद्धी ।
तिकडं धीर कुठाय माय लेकाला । (जिजा शिवबाला–
प्रतापगडाला) आधींच निघाला ।
अर्ध्या वाटेला । गडावर दिसली विजय ज्वाळा ।
रात्रभर न्हवता डोळ्याला डोळा । सूर्य उदयाची होती
वेळा ।
मारली टाच कृष्णा घोडीला । वेळ काय तिला ।
किल्ला गाठायाला । येताच तिथं लागली पहिली चौकी ।
लगेच घोडीवरनं उडी टाकीं । सारे शोकाकुल अवलोकी ।
(चाल)–शिवबा जरी धीर वीर मुत्सद्दी । तरी गोंधळला
खालतं आधी ।
उठेना पाऊल त्याचं जलदी । चित्ती खवळला दुःख उदधी ।
वरतं देखावा एकच गर्दी । तान्हा पहुडला सर्वांमधी ।
(चाल)–येताच शिवबा कडकडून मामा भेटला ।
शिववास दुःख अनिवार कंठ दाटला ।
म्हणी गड आला परी सिंह माझा हरपला ।
आता काय जाऊनी सांगू माझ्या आईला ।
बरं झालं देवा आई नाही अशा या वेळेला ।
आकांत किती केला असता ठाऊक एक तुला ।
(मिळवणी)–सदाशिव शाहीर सांगे सर्वाला । मातृभक्ताला ।
अनुभव आपुला । सुशिक्षण धीर वीर दायी ।
जगी देवता एक आई । धन्य मातोश्री जिजाबाई ।
अखेर सांगणे एक राहिले । ताल सूरवाले ।
पाठीराखे भले । लाभले म्हणून रंग हाई ।
श्रोते तुम्ही हंस-क्षीर न्यायी । सदाशिव शाहीर धन्य होई ।



प्रकाशक : **वसंत शंकर नानिवडेकर**, नानिवडेकर शाहिरी संगम,
१/१८, गोरेगांवकर चाळ, गिरगाव, मुबई ४००००४

मुद्रक : **व. वि. आपटे**, बी. कॉम्. हिंदुस्थान मुद्रणालय,
१४८२ शुक्रवार पेठ, शनिपार–मंडई रस्ता, पुणे २.